





दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : १३१ • पुणे • शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313


सनी निम्हण यांनी घेतली विरोधकांची भेट 3






संयम, निष्ठा आणि संघर्षातून मिळवले यश 4


## ठळक बातम्या

### नवे सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प सुरू

पुणे (आरंभ पर्व) : शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा गाठत वारजे, मुंढवा आणि वडगाव बुद्रुक येथील तीन सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प (एसटीपी) येत्या सोमवार (दि. 26 जानेवारी) पासून सुरू करण्यात येणार आहेत. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून या प्रकल्पांचे उद्घाटन होणार असून, प्रारंभी प्रकल्पांचा ट्रायल रन घेतला जाणार आहे. पुढील तीन ते चार महिन्यांत हे प्रकल्प पूर्णक्षमतेने कार्यरत होतील, अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.

### मुलीला आईचीच अधिक गरज

पुणे (आरंभ पर्व) : वयाच्या पन्नाशीत पोहोचलेल्या दाम्पत्यांचा घटस्फोट कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश बी. डी. कदम यांच्या न्यायालयाने मंजूर केला आहे. पतीकडून शारीरिक आणि मानसिक छळ होत असल्याचा आरोप करत घटस्फोटासह दोन मुलांच्या ताब्याची मागणी पतीने केली. न्यायालयाने घटस्फोटाचा अर्ज मान्य करत घटस्फोट मंजूर केला. मात्र, मुलगा हा सज्ञान आहे तर सतरा वर्षीय मुलीला वडिलांपेक्षा आईची गरज अधिक असल्याचे नमूद करत मुलांच्या ताब्याची मागणी फेटाळून लावली.

### स्क्रॅप जाळणीतून विषारी धुराचा कहर

फुरसुंगी (आरंभ पर्व) : फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद हद्दीतील उरुळी देवाची गावातील काही गोदामांमध्ये अनधिकृतपणे स्क्रॅप प्रोसेसिंगसोबत रात्रीच्या वेळेस प्लास्टिक, रबर, केबल वायर व ई-वेस्टसारखा अत्यंत विषारी कचरा खुलेआम जाळला जात आहे. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात विषारी धूर पसरत असून, येथील रहिवाशांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हा रबरसदृश्य कचरा जाळल्यामुळे निर्माण होणाऱ्या विषारी धुरामुळे परिसरातील नागरिकांना श्वसनास त्रास, डोकेदुखी, मळमळ, उलटी, डोळ्यांची जळजळ अशा तक्रारी वाढल्या आहेत.

### बंडखोरी रोखण्याचे मोठे आव्हान

सासवड (आरंभ पर्व) : पुरंदर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. उमेदवारी न मिळाल्याने अनेक इच्छुकांनी बंडाचा झेंडा उंचावल्याचे स्पष्ट झाले असून, ही बंडखोरी रोखण्याचे मोठे आव्हान सर्वच पक्षांच्या नेत्यांपुढे उभे ठाकले आहे. विशेषतः भाजपमध्ये बंडखोरी शमविण्यात पक्षनेत्यांना यश येणार की नाही, याची उत्सुकता असून, त्याचे उत्तर 27 जानेवारीला मिळणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी तालुक्यात नाट्यमय घडामोडींना वेग आला. शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या वीर गटात मोठा राजकीय धक्का बसला. शिवसेनेचे तालुकाध्यक्ष व इच्छुक उमेदवार हरिभाऊ लोळे यांची उमेदवारी नाकारल्याने त्यांनी थेट भाजपमध्ये प्रवेश करीत सर्वांनाच आश्चर्यचकित केले.

# पुणे महापालिकेत महापौरपदासाठी हालचाली वेगात

## महिला आरक्षणामुळे समीकरणे बदलली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेच्या महापौरपदासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाल्याने शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. या आरक्षणामुळे आगामी महापौर महिला असणार हे स्पष्ट झाले असून, सत्ताधारी भाजपमधूनच महापौरपदासाठी नगरसेविकेची निवड होणार आहे. त्यामुळे पालिकेत 'महिलाराज' येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.




महापालिका निवडणुकीत ११९ जागा जिंकत भाजपने निर्विवाद बहुमत मिळवले आहे. गुरुवारी मुंबईतील मंत्रालयात नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली. त्यात पुणे महापालिकेचे महापौरपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याचे स्पष्ट झाले. या निर्णयानंतर भाजपमधील अनेक इच्छुक पुरुष नगरसेवकांचे महापौरपदाचे स्वप्न भंगले, तर महिला नगरसेविकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

भाजपकडून महापौरपदासाठी अनेक अनुभवी नगरसेविकांची नावे चर्चेत आहेत. चौथ्यांदा निवडून आलेल्या वर्षा तापकीर यांच्यासह मंजुषा नागपुरे, रंजना टिळेकर, मानसी देशपांडे, स्वरादा बापट आणि निवेदिता एकबोटे या नावांची जोरदार चर्चा सुरू आहे. वर्षा तापकीर या २००७ पासून सलग चार वेळा सभागृहात निवडून आल्या आहेत. २०१७ मध्ये भाजपची सत्ता असतानाही त्यांना कोणतेही महत्त्वाचे पद देण्यात आले नव्हते. त्यामुळे यंदा त्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मंजुषा नागपुरे तिसऱ्यांदा, रंजना टिळेकर चौथ्यांदा तर मानसी देशपांडे तिसऱ्यांदा सभागृहात दाखल झाल्या आहेत. स्वरादा बापट आणि निवेदिता एकबोटे या पहिल्यांदाच नगरसेविका झाल्या आहेत.

महिला सर्वसाधारण आरक्षण निघाल्याने अनेक वरिष्ठ नेत्यांची निराशा झाली आहे. २०१२ मध्ये महिला ओबीसी आणि २०१७ मध्ये सर्वसाधारण आरक्षण असल्याने त्या काळात अनेकांना महापौर होण्याची संधी मिळाली होती. यंदा मात्र महिला आरक्षणामुळे अनेक इच्छुक पुरुष नगरसेवकांना बाजूला व्हावे लागले आहे. निवडणुकीनंतर महापौरपद आपल्यालाच मिळेल, या अपेक्षेने अनेकांनी शुभेच्छा फलकही लावले होते. मात्र आरक्षण जाहीर होताच ही गणिते कोलमडली.

आता भाजप अनुभवी महिला नगरसेविकेला संधी देणार की 'धक्कातंत्र' वापरून नव्या चेहऱ्याला महापौरपद देणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. शहरातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची भूमिका महापालिकेचा अनुभव असलेल्या आणि सक्षम नेतृत्व देऊ शकणाऱ्या नगरसेविकेच्या बाजूने असल्याचे समजते. तरीही अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठी घेणार असल्याने अनपेक्षित नाव पुढे येण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

दरम्यान, विधानसभा मतदारसंघांच्या समीकरणांकडेही लक्ष दिले जात आहे. २०१७ मध्ये कसबा आणि कोथरूड मतदारसंघाला महापौरपदाची संधी मिळाली होती, तसेच स्थायी समिती अध्यक्षपद आणि सभागृह नेतेपद पर्वती व कसबा मतदारसंघाकडे गेले होते. त्यामुळे यंदा खडकवासला, वडगाव शेरी, शिवाजीनगर किंवा हडपसर मतदारसंघातून महापौर निवडला जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

पुणे महापालिकेला आतापर्यंत नऊ महिला महापौर लाभल्या असून, यंदा दहावी महिला महापौर निवडली जाणार आहे. त्यामुळे ही निवड केवळ राजकीयदृष्ट्याच नव्हे, तर ऐतिहासिकदृष्ट्याही महत्त्वाची ठरणार आहे. आता भाजप कोणाच्या गळ्यात महापौरपदाची माळ घालते, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

### पुणे महापालिकेत आतापर्यंत नऊ महिला महापौर

- कमल व्यवहारे २० मार्च १९९६
- ॲड. वंदना चव्हाण १५ मार्च १९९७
- वत्सला आंदेकर २० मार्च १९९८
- दिप्ती चवधरी १५ मार्च २००२
- रजनी त्रिभुवन १५ मार्च २००५
- राजलक्ष्मी भोसले १५ मार्च २००७
- वैशाली बनकर १५ मार्च २०१२
- चंचला कोंद्रे ५ सप्टेंबर २०१३
- मुक्ता टिळक १५ मार्च २०१७

### भाजप कुणाला संधी देणार?

**महापालिका निवडणुकीत ११९ जागा जिंकून एकहात्ती सत्ता आलेल्या भाजप महापौरपदाची माळ अनुभवी महिला नगरसेविकेच्या गळ्यात टाकणार की धक्कातंत्र वापरून नवीन महिला चेहऱ्याला संधी देणार? याची उत्सुकता लागली आहे. त्यामुळेच आयत्या वेळी अनुभवी नावे मागे पडून अनपेक्षित नाव पुढे येईल असाही कयास बांधला जात आहे. महापालिकेत सक्षम नेतृत्व असणे गरजेचे आहे. त्यामुळे महापालिकेच्या कारभाराचा अनुभव असलेल्या व्यक्तीलाच महापौरपद द्यावे, अशी शहर पातळीवरील पदाधिकाऱ्यांची भूमिका आहे.**

## महिलेच्या पोटातून निघाली तब्बल १८ किलो वजनाची गाठ!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एका ५१ वर्षीय महिलेच्या गर्भाशयाच्या आकारात अगदी कमी काळात मोठी वाढ झाली. तिला दोन महिन्यांपासून मासिक पाळीत अतिरक्तस्रावाचा त्रास होऊ लागला. त्यामुळे तिच्या प्रकृतीत बिघाड होऊन रुग्णालयात दाखल करावे लागले. वैद्यकीय तपासणीत तिच्या गर्भाशयात मोठी गाठ असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी पोटाची खुली शस्त्रक्रिया करून ही १८ किलोची गाठ यशस्वीपणे बाहेर काढल्याने या महिलेला जीवदान मिळाले आहे. ही महिला दोन महिन्यांपासून मासिक पाळीतील तीव्र स्वरूपाच्या रक्तस्रावाने त्रस्त होती. वैद्यकीय उपचारासाठी ती आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये दाखल झाली. त्यावेळी तिचे हिमोग्लोबिन केवळ ५ ग्रॅम प्रति डेसिलिटर एवढे खाली आले होते. तिला आधीपासून हृदयविषयक समस्याही होत्या. महिलेवर शस्त्रक्रिया करण्यापूर्वी महत्त्वाच्या मूत्रमार्ग संरचनांचे संरक्षण करण्यासाठी युरेटरिक स्टेंटिंग म्हणजेच मूत्रपिंडातून मूत्राशयाकडे जाणाऱ्या मूत्रनलिकेत स्टेंट तात्पुरता बसवण्याची प्रक्रिया करण्यात आली. तिला हृदयविषयक धोका अधिक असल्याने सतत हृदयाचे निरीक्षण करण्यात आले. कर्करोगाचा संशय दूर करण्यासाठी तपासण्या करण्यात आल्या. गर्भाशयातील गाठीचा आकार मोठा



असूनही शल्यचिकित्सकांनी पोटावरील खुल्या शस्त्रक्रियेद्वारे १८ किलो वजनाची गाठ एकाच वेळी यशस्वीपणे बाहेर काढली. विशेष म्हणजे, शस्त्रक्रियेदरम्यान रक्तस्राव १०० मिलीपेक्षाही कमी झाला. त्यामुळे रुग्णाला शस्त्रक्रियेदरम्यान अथवा नंतर रक्त देण्याची गरज भासली नाही. गर्भाशयातील गाठीचा मोठा आकार आणि रुग्णाची खालावलेली प्रकृती यामुळे हे प्रकरण आव्हानात्मक होते.

यासाठी काटेकोर शस्त्रक्रियापूर्व नियोजन, रक्तासाठीचे व्यवस्थापन आणि अचूक शस्त्रक्रियेच्या माध्यमातून आम्ही आजूबाजूच्या अवयवांना इजा न करता संपूर्ण गाठ सुरक्षितपणे काढू शकलो. यासाठी लवकर निदान आणि वेळेवर वैद्यकीच हस्तक्षेप महत्त्वाचा ठरला, असे कर्करोगतज्ज्ञ डॉ. निखिल पर्वते यांनी सांगितले. या महिलेवरील उच्च जोखमीच्या शस्त्रक्रियेदरम्यान सतत हृदयविषयक निरीक्षण आणि समन्वयाने काम करणाऱ्या बहुशाखीय पथकांच्या मदतीने सुरक्षितपणे उपचार देता आले.

## आज पुण्याच्या वाहतुकीत मोठा बदल! 'हे' रस्ते पूर्ण बंद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरात आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धांचे आयोजन केल्याने शहरातील वाहतुकीत शुक्रवार, (२३ जानेवारी) रोजी मोठा बदल करण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यात आयोजित केलेल्या 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६' या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचा चौथा टप्पा आज (ता. २३) होणार आहे. ही स्पर्धा बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. या मार्गाचे एकूण अंतर ५८ कि.मी. आहे. या स्पर्धेत देश-विदेशातील प्रख्यात सायकलस्वार सहभागी होणार आहेत. या स्पर्धेची सुरुवात बालेवाडी येथे होऊन त्याचा समारोप बालगंधर्व रंगमंदिर परिसरात होणार आहे. त्यामुळे पुणे शहरातील होणारी वाहतूक कोंडीचा त्रास टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. स्पर्धेदरम्यान कोणते मार्ग बंद राहतील याबाबत जाणून घेऊयात...

या स्पर्धेचा मार्ग डेक्कन पोलीस स्टेशन हद्दीतून जात असल्याने डेक्कन पोलीस स्टेशनकडून एक प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. यामध्ये कोणते रस्ते पूर्णपणे बंद राहणार आहेत याची माहिती देण्यात आली आहे. तसेच नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या स्पर्धेचा समारोप बालगंधर्व परिसरात होणार असल्याने पुण्याच्या मध्यवर्ती भागात प्रवास टाळण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

कोणते मार्ग बंद असणार?

'पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६' या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचा चौथा टप्पा हा डेक्कन परिसरातून जाणार आहे. त्यामुळे शहराच्या मध्यवर्तीचे बरेच रस्ते बंद असणार आहेत. डेक्कन परिसरातील या स्पर्धेचा मार्ग संपूर्ण सेनापती बापड रोड, संपूर्ण कर्वे रोड, कॉलेज रोड, संपूर्ण फर्ग्युसन कॉलेज रोड, संपूर्ण प्रभात रोड, संपूर्ण जंगली महाराज रोड असा असणार आहे. त्यामुळे शुक्रवारी या रस्त्यांचा वापर टाळण्याच्या सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत.

१. मॅरेथॉन सकाळी दहा ते सायंकाळी सहा या दरम्यान असेल. या काळात बातमीत दिलेल्या मुख्य रस्त्यांवरील वाहतूक पूर्णपणे थांबवण्यात आलेली आहे. शक्य त्या ठिकाणी पर्यायी मार्ग उपलब्ध करुन दिलेले आहेत.
२. २३ जानेवारी रोजी वरील सर्व रस्त्यावर पूर्णपणे नो पार्किंग असणार आहे. सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर किंवा रस्त्यावर आपली वाहने पार्क करू नयेत.
३. मॅरेथॉनच्या वेळेत सोसायटीतून कोणतेही वाहन बाहेर पडणार नाही याची दक्षता घ्यावी. आवश्यक कामासाठी बाहेर पडू इच्छित असणाऱ्यांनी सकाळी ९ पूर्वी बाहेर पडावे.
४. सुरक्षिततेच्या दृष्टीने आपली लहान मुले आणि पाळीव प्राणी यांना रस्त्यावर किंवा सोसायटीच्या गेटजवळ मोकळे सोडू नका.
५. या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी आपण शिस्तबद्ध पध्दतीने फुटपाथवर थांबू शकता, तसेच टाळ्या वाजवून स्पर्धकांना प्रोत्साहन देऊ शकता.
६. स्पर्धेदरम्यान सुरक्षेसाठी असलेल्या पोलिसांकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

### असा असेल स्पर्धेचा चौथा टप्पा

**पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६ आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या टप्पा क्रमांक चार अंतर्गत छत्रपती शिवाजी स्टेडियम, बालेवाडी येथून स्पर्धेला सुरुवात होणार असून ती पुणे शहरहद्दीत जाऊन परत राजीव गांधी ब्रिजमार्गे पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीत प्रवेश करणार करुन सांगवी, वाकड, निगडी, त्रिवणीनगर, भोसरी, चिखली, पिंपरी काळेवाडी परिसरातून फिरुन परत राजीव गांधी ब्रिज मार्गे पुणे शहर हद्दीत प्रवेश करणार आहे. ही स्पर्धा सुरळीत व सुरक्षितपणे पार पाडण्याकरिता तसेच नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्याकरिता स्पर्धा मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आलेली असून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आलेली आहे.**

# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात , 'द एलिशियन फिल्ड', 'बाप्या' सर्वोत्कृष्ट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या आठ दिवसांपासून जगभरातील चित्रपटांची पर्वणी दिलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) 'द एलिशियन फिल्ड' हा भारतीय चित्रपट प्रभात उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्काराचा मानकरी ठरला, तर संत तुकाराम उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार 'बाप्या' या चित्रपटाने पटकावला.




पुणे फिल्म फाउंडेशन, महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी यांच्यातर्फे आयोजित २४व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा (पिफ) समारोप गुरुवारी बालगंधर्व रंगमंदिरात झाला. या वेळी महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरणाचे सह-व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर आणि आंतरराष्ट्रीय परीक्षकांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. याच कार्यक्रमात भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते बिस्वजित चॅटर्जी, ज्येष्ठ अभिनेत्री फरिदा जलाल आणि आशा काळे यांना 'पिफ डिस्टिंग्वीश ॲवॉर्ड', तर ज्येष्ठ व्हायोलिनवादक अमर हलदीपूर यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी 'संगीतकार एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. तर, टाटा मोटर्सचे व्यवस्थापक आनंद आगाशे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी मुंबई चित्रनगरीच्या दिनदर्शिका आणि डायरीचे प्रकाशन करण्यात आले.

प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ, महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, मोहन आगाशे, सतीश आळेकर, समर नखाते, अभिजित रणदिवे, 'पिफ'चे उपसंचालक विशाल शिंदे, आदिती अक्कलकोटकर आदी उपस्थित होते. चित्रपट निवड समितीमध्ये बी. जयमोहन, पिटर केरेकेस, रिट्टा आल्टो, सिनू रामासामी, सेर्गी कासामीतजाना, येसिम उस्ताओग्लू यांचा समावेश होता.

### आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

- प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार : द एलिशियन फिल्ड, दिग्दर्शक-प्रदीप कुरबाह
- प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट दिग्दर्शक पुरस्कार : लॉरा वँडेल, (ॲडम्स सेक)
- ज्यूरी स्पेशल मेन्शन : लॉस्ट लँड, दिग्दर्शक-अकिओ फुजीमोटो
- संत तुकाराम सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट : बाप्या, दिग्दर्शक-समीर तिवारी
- सर्वोत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शक : संतोष डावखर, (गोंधळ)
- सर्वोत्कृष्ट चित्रपट अभिनेता : गिरीश कुलकर्णी, (बाप्या)
- सर्वोत्कृष्ट अभिनेत्री : राजश्री देशपांडे, (बाप्या)
- सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार : अमलेंदू चौधरी, (बाप्या)
- सर्वोत्कृष्ट पटकथा : इरावती कर्णिक, (तो ती आणि फुजी)
- ज्यूरी स्पेशल मेन्शन : दिग्दर्शक – रवींद्र माणिक जाधव (जीव), अभिनय – ललित प्रभाकर (तो ती आणि फुजी)

## थोडक्यात पण महत्वाचे




### स्टार्ट अप्स करता दिले जाणार २० कोटी रुपयांचे अनुदान

पुणे (आरंभ पर्व) : एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे आज त्याच्या आर्थिक वर्ष २६ च्या परिवर्तन स्टार्ट अप्स ग्रँट्स कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली, हा उपक्रम समाजावर सकारात्मक परिणाम करणाऱ्या नाविन्यांना सहकार्य करत असतो. गेल्या काही वर्षांपासूनच्या उपक्रमांकडून अनुभव प्राप्त केल्यानंतर आता हा उपक्रम आता १० प्राधान्यक्रम असलेल्या क्षेत्रांना सहकार्य करणार असून यांत पर्यावरणातील नाविन्य, कृषी आणि शाश्वत जीवनव्यापन, उत्पादन आणि एमएसएमईतील नाविन्य, वित्तीय समावेशन, लैंगिक वैविध्य आणि समावेशकन तसेच नवीन अशा एआय आणि डीप टेक्नॉलॉजी इत्यादींचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २६ मध्ये एचडीएफसी बँक परिवर्तन तर्फे २० कोटी रुपयांचे नॉन डायल्युटिव्ह ग्रँट्स देण्यात येणार असून यामुळे साधारणपणे पायलट्स, वैधता आणि अर्ली स्टेज स्केल अप ला मदत होऊ शकेल. आर्थिक वर्ष २६ च्या या पर्वा मध्ये आणखी एक विशेष घटना असून १० वर्षे पूर्ण होत असतांना ही भागीदारी आता विविध क्षेत्रातील प्रतिथयश संस्थांच्या इन्क्युबेटर्स बरोबरही करण्यात येणार आहे. परिवर्तन स्टार्ट अप ग्रँट्स प्रोग्राम हा उपक्रम इन्क्युबेटरवर आधारीत, पोर्टफोलिओ वर आधारीत मॉडेल नुसार काम करत असून या अंतर्गत भागीदार इन्क्युबेटर्स प्रोग्रामचे डिझाईन, स्टार्टटप ची पोहोच, मुल्यांकन, मार्गदर्शन, देखरेख आणि परिणामाचे रिपोर्टिंग वर लक्ष केंद्रित करतो.

### एअरटेल आयपीटीव्ही सोबत रिपब्लिक डे वीकेंड खास बनवा




पुणे (आरंभ पर्व) : रिपब्लिक डे च्या आठवड्याच्या सुट्टीत आता आपल्या मनाला ताजेतवाने करण्याची वेळ आली आहे. फक्त तिरंगा फडकवणे, कौटुंबिक जेवण किंवा सुट्टीचा आनंद घेणे पुरेसे नाही; हृदयाला भिडणारे, साहस, धैर्य आणि स्वातंत्र्याचे संदेश देणारे चित्रपट पाहून तुम्ही स्वतःला प्रेरणा आणि आनंद देऊ शकता. एअरटेल आयपीटीव्हीच्या माध्यमातून तुम्ही 29+ स्ट्रीमिंग ॲप्स, 600+ लाईव्ह टीव्ही चॅनेल्स आणि ऑन-डिमांड लायब्ररीसह हे चित्रपट घरच्या मोठ्या स्क्रीनवर पाहू शकतात. रिपब्लिक डे च्या दिवशी बघण्याजोग्या चित्रपटांमध्ये ‘फ्रीडम ॲट मिडनाईट सीझन 2, ‘द नाईट मॅनेजर सीझन 2’, ए नाईट ऑफ द सेवन किंगडम्स, ‘टास्करी: द स्मगलर्स वेब’, ‘हायजॅक’, ‘स्ट्रेंजर थिंग्ज 5’ यासारखी थरारक मालिका तसेच ‘120 बहादूर’, “बॉर्डर’, ‘शेरशाह’, ‘उरी: द सर्जिकल स्ट्राइक’, ‘राझी’ यासारखी देशभक्ती प्रेरित चित्रपटं उपलब्ध आहेत. एअरटेल आयपीटीव्हीचे प्लॅन्स फक्त 699 रुपयांपासून सुरू होतात आणि नवीन प्लॅन्सवर एअरटेल थँक्स ॲपद्वारे 30 दिवसांची मोफत सेवा देखील मिळते. या दिवशी देशभक्ती, शौर्य आणि प्रेरणादायी कथा पाहून सुट्टीचा आनंद दुपटीने वाढवा आणि देशभक्तीच्या भावनेत लांब वीकेंड साजरा करा!.

### आयसीएसआयचे नवे नेतृत्व जाहीर



पुणे (आरंभ पर्व) : इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (आयसीएसआय) ने २०२६ या वर्षासाठी सीएस पवन जी चंदक यांची अध्यक्षपदी, तर सीएस द्वारकानाथ चेनूर यांची उपाध्यक्षपदी निवड केली आहे. ही निवड १९ जानेवारी २०२६ पासून लागू होणार आहे. नव्या नेतृत्वाखाली आयसीएसआय सुशासन, क्षमता-निर्माण आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यावर भर देणार आहे. यासोबतच सीएसईईटी परीक्षेत सुधारणा, नवीन शैक्षणिक अभ्यासक्रम, ईएसजी व शाश्वततेसंबंधी उपक्रम आणि सामाजिक सहभाग कार्यक्रम राबवले जाणार आहेत.

### टोयोटा किर्लोस्कर मोटरने लॉन्च केली ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला



मुंबई (आरंभ पर्व) : टोयोटा किर्लोस्कर मोटर (TKM) ने आज ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला लॉन्च करण्याची घोषणा केली. अशाप्रकारे टोयोटाने भारताच्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहन सेगमेन्टमध्ये पदार्पण केले आहे. इलेक्ट्रिफाईड मोबिलिटीत टोयोटाच्या जागतिक नैपुण्यासह, ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलामध्ये बोल्ड SUV स्टाइलिंग, प्रीमियम केबिन अनुभव तसेच आत प्रशस्त जागा, प्रगत टेक्नॉलॉजी आणि स्मूद, विश्वसनीय इलेक्ट्रिक परफॉर्मन्सची खात्री आहे. अर्बन SUV संकल्पनेतून जन्मलेली ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला, टोयोटाच्या मल्टीपाथ दृष्टिकोनास पुढे घेऊन जाण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, जे ग्राहकांना इलेक्ट्रिफाईड पॉवरट्रेन टेक्नॉलॉजीचे अधिक पर्याय देते आणि भारताच्या एनर्जी सिक्युरिटी आणि डीकार्बनायझेशनच्या लक्ष्यास पाठिंबा देते. प्रस्तुत नवीन ऑफरिंगबाबत टिप्पणी करताना टोयोटा किर्लोस्कर मोटरचे अध्यक्ष, मॅनिजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर श्री. मसाकाझू योशिमुरा म्हणाले, “ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलाचे लॉन्चिंग हे आमच्या मल्टीपाथवे दृष्टिकोनास पुढे नेण्याच्या दिशेतील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आमचे लक्ष्य सर्वांना सोबत घेऊन कार्बन न्यूट्रलिटीत योगदान देण्याचे आहे. आता, भारतात ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलाच्या लॉन्चसह आम्ही हरित मोबिलिटीच्या दिशेने होणाऱ्या भारताच्या प्रवासात आमचे समर्थन अधिक मजबूत करण्याबाबत वचनबद्ध आहोत. आमची आकर्षक उत्पादन श्रेणी, टेक्नॉलॉजी लीडरशिप, सशक्त आफ्टर-सेल्स सर्व्हिस आणि डीलरशिप नेटवर्कसह, आम्ही सर्वांना मोबिलिटीचे स्वातंत्र्य देत आपले शाश्वत मोबिलिटीचे लक्ष्य प्राप्त करू इच्छितो.” या प्रसंगी उपस्थित असलेले टोयोटा किर्लोस्कर मोटरचे डेप्युटी मॅनिजिंग डायरेक्टर, श्री. तादाशी असाझुमा म्हणाले, “इलेक्ट्रिफाईड टेक्नॉलॉजीत तीन दशकांच्या जागतिक नैपुण्यासह टोयोटाने वेगवेगळ्या मोबिलिटी गरजा पूर्ण करण्यासाठी निरंतर फोकस्ड इनोव्हेशनमध्ये गुंतवणूक केली आहे.

# ब्लेंडर्स प्राईडने झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची केली घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या प्रीमियम व्हिस्की विभागातील अग्रेसर असलेल्या ब्लेंडर्स प्राइडने, ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीची घोषणा केली आहे. ही एक मर्यादित-एडिशन असून, यात आकर्षक काळ्या रंगाची स्टाइल आणि आकर्षक ब्लेंडर्स प्राइडचे मिश्रण असून त्याआधारे एक खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण अनुभव निर्माण करण्यात आला आहे. उत्तम आरामदायीपणा आणि वेगळेपणाचे प्रतीक असलेल्या आकर्षक काळ्या




डिझाइनमध्ये सादर केलेली, झेनिथ ब्लॅक एडिशन विशेषतः अशा व्यक्तींसाठी तयार करण्यात आली आहे जी व्हिस्कीची जाणकार असून – लाखात एक असेल. केवळ दहा लाख बॉटल्स उपलब्ध असल्याने, ही एडिशन जितकी सुंदर आहे, तितकीच दुर्मिळही आहे.

आरामदायीपणाच्या या जगात, काळा रंग हा केवळ रंगच नाही तर आणखी बरेच काही दर्शवतो—काळा रंग म्हणजे वृत्ती आहे, तो एक प्रतिष्ठा आणि सामर्थ्याची झलक आहे. ब्लेंडर्स प्राइडशी दीर्घकाळापासून संबंधित असलेला काळा रंग, आता एका नाविन्यपूर्ण डिझाइनमध्ये केंद्रस्थानी आहे, ज्यामुळे प्रीमियम व्हिस्की आणखीणच आकर्षक बनते. ही एडिशन केवळ नवीन पॅकेजिंग नव्हे; तर स्टाईलचे एक्सप्रेशन आहे, ही अशा लोकांसाठी आहे जे ट्रेंडच्या मागे धावत नाहीत, तर स्वतःच ट्रेंड निर्माण करतात.

पर्नोड रिकार्ड इंडियाच्या CMO देवश्री दासगुप्ता म्हणाल्या, “ब्लेंडर्स प्राइड भारतात प्रीमियम व्हिस्कीचे बेंचमार्क सातत्याने नवनवीन पद्धतीने तयार करत असते. झेनिथ ब्लॅक एडिशनच्या सुरुवातीमुळे हा ब्रँडचा आतापर्यंतचा सर्वात उत्कृष्ट आविष्कार समोर आला आहे—ही एक अशी उत्क्रांती आहे, जी व्हिस्कीच्या वारस्याला धाडसी नवीन डिझाइन स्टाईलमध्ये बदलते. या वर्षी, ब्लेंडर्स प्राइड महत्त्वाकांक्षा, वेगळेपणा आणि कारागिरीचा गौरव करणाऱ्या सौंदर्यदृष्टीतून आपली मुलभूत मूल्ये जागृत करत आहे. केवळ दहा लाख बॉटल्सपुरते मर्यादित असलेली झेनिथ ब्लॅक एडिशन अशा व्यक्तींसाठी तयार केली गेली आहे, ज्या केवळ उत्तमतेचे कौतुकच करत नाहीत, तर स्वतःमध्ये ती उत्तमता आणण्याचा प्रयत्न करतात.”

ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशन अशांसाठी आहे जे नेहमी वेगळे काहीतरी शोधत असतात – ही एडिशन असा एक असाधारण अनुभव आहे जो गुणवत्तेशी तडजोड न करता खरोखर काहीतरी देतो.

संपूर्ण भारतात सुरूवात होणार असलेली ब्लेंडर्स प्राइड झेनिथ ब्लॅक एडिशन सध्या मात्र केवळ निवडक स्टोअर्समध्येच उपलब्ध आहे.

## सर्वात आवडता टीव्ही शो आता मोठ्या पडद्यावर

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात लोकप्रिय टेलिव्हिजन कॉमेडी आता मनोरंजनाचा स्तर आणखी उंचावण्यासाठी सिद्ध झाली आहे आणि ती ही थेट मोठ्या पडद्यावर. तब्बल दहा वर्षांहून अधिक काळ प्रेक्षकांचे मनोरंजन केल्यानंतर ‘भाभीजी घर पर हैं!’ ही मालिका आता आपल्या विश्वाचा विस्तार करत चित्रपटाच्या रूपात सादर होत आहे—‘भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन’. झी स्टुडिओज आणि एडिट II यांनी आज चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केला असून तो प्रेक्षकांना




नेमके जे अपेक्षित आहे तेच देण्याचे वचन देतो — न थांबणारी कॉमेडी, गोंधळ आणि धमाल मनोरंजनाचा पूर्ण डोस! ट्रेडमार्क विनोद, रंगतदार नाट्य आणि अतिशयोक्ती, मोठ्या पडद्याला साजेशा प्रसंगांनी भरलेला हा ट्रेलर प्रेक्षकांना एका झपाट्याने पुढे जाणाऱ्या, खळखळून हसवणाऱ्या सिनेमॅटिक प्रवासाची झलक दाखवतो.

## मराठी ZEE5च्यावतीने आगामी ओरिजनल सिरीज देवखेळचा ट्रेलर प्रसिद्ध

- **पौराणिक कथा, गुन्हा आणि न्यायची सरमिसळ**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी ZEE5 ने आज त्याच्या आगामी मराठी ओरिजनल सिरीज Devkhel (देवखेळ)चा ट्रेलर प्रदर्शित केला. कोकणातील फारशा ऐकिवात नसलेल्या लोककथांपासून प्रेरित, देवखेळ हा एक गहन मानसशास्त्रीय थरारपट आहे. जो शिमगा (होळी) सणाच्या भीतीदायक पार्श्वभूमीवर परंपरा, अंधश्रद्धा आणि गुन्हेगारी यांची सरमिसळ करतो. ही सिरीज दिनांक 30 जानेवारीपासून खास ZEE5 वर स्ट्रीम होणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील देवताली किनारपट्टीवरील गावावर आधारित,




देवखेळ एका थरारक रहस्यावर आधारित आहे- दरवर्षी होळी पौर्णिमेच्या रात्री, एखाद्याचा मृत्यू होतो. हे मृत्यू न्यायाचे प्रतीक म्हणून स्थानिक पातळीवर पूजल्या जाणाऱ्या शंकासुर या पौराणिक लोककथा व्यक्तिरेखेने दिलेल्या दैवी शिक्षेची कृत्ये आहेत, असा गावकऱ्यांचा विश्वास आहे. ट्रेलरमध्ये अशा जगाची झलक दाखवण्यात आली आहे, जिथे श्रद्धा तर्कशक्तीवर मात करते. भीती ही शांततेला अधोरेखित करते आणि सत्य विधीत दडलेले असते. जेव्हा इन्स्पेक्टर विश्वास सरंजामे गावात येतो, तेव्हा तो अंधविश्वासाला स्पष्टीकरण म्हणून स्वीकारण्यास नकार देतो. ही काळजीपूर्वक लपवून केलेली हत्या असल्याचे त्याचे मत असते. त्याचा तपास सुरू करतो. या मालिकेत इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या भूमिकेत अंकुश चौधरी असून प्राजक्ता माळी, यतीन कार्येकर, अरुण नलावडे, वीणा जामकर आणि मंगेश देसाई यांच्या प्रमुख भूमिका आहेत. दिग्दर्शक चंद्रकांत लता गायकवाड पुढे म्हणाले, “देवखेळचा जन्म शंकासुर लोककथा परंपरेबद्दलच्या आकर्षणातून झाला - एक विश्वास प्रणाली जिथे न्यायाकडे संस्थात्मक नाही तर दैवी म्हणून पाहिले जाते. आघात, श्रद्धा आणि भीती ह्यामुळे मानवी मनाचे रुपांतर मिथकात कसे होऊ शकते, हा शोध ही सिरीज घेते. ही केवळ एक गुन्हेगारी कथा नाही, तर एक भावनिक आणि मानसिक प्रवास आहे. मराठी ZEE5 ने ही कथा प्रामाणिकपणे आणि निर्भयपणे सांगण्यासाठी परिपूर्ण व्यासपीठ उपलब्ध केले. प्रेक्षकांनी ती अनुभवावी यासाठी आम्ही उत्सुक आहोत.”

## देशभरातील गुंतवणूकदारांकरिता खास अभियानाला प्रारंभ

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

फ्रँकलिन टेम्पलटन (इंडिया) ने 'चेंज द सोच - कन्याकुमारी टू काश्मीर ड्राइव्ह' या आपल्या देशव्यापी मोहिमेला आज हिरवा झेंडा दाखवला. सर्वसामान्यांमध्ये विशेषतः महिलांमध्ये आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी सरु करण्यात आलेले हे अशा प्रकारचे पहिले अभियान आहे. भारतात फ्रँकलिन टेम्पलटनच्या वाटचालीला ३० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल ही ३० दिवसांची मोहिम देशाचे दक्षिण टोक असलेल्या कन्याकुमारीपासून सुरू होईल आणि देशातील २१ शहरांमधून प्रवास करत जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगरमध्ये तिची सांगता होईल. उपस्थितांशी संवाद साधणारी आर्थिक शिक्षण सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि सामुदायिक सहभाग या



आधारे म्युच्युअल फंड गुंतवणुकीचे रहस्य दूर करणे, त्याचबरोबर आपल्या आर्थिक भविष्याची जबाबदारी स्वीकारण्यासाठी हजारो भारतीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. देशभरात आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देणाऱ्या या मोहिमेचे नेतृत्व फ्रँकलिन टेम्पलटन इंडियाचे अध्यक्ष अविनाश सातवळेकर हे करणार आहेत. या मोहिमेदरम्यान ते दर दोन दिवसाला विविध शहरांतील किंवा गावातील महिला गटांबरोबर गुंतवणूकदार शिक्षण कार्यशाळेतून संवाद साधणार आहेत. या कार्यशाळेत जीवनातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बचत, गुंतवणूक आणि दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याचे महत्त्व हे मुद्दे या महिला गटांसमोर स्पष्ट केले जाणार आहेत. या उपक्रमात विविध क्षेत्रातील घटकांना सहभागी करुन घेतले जाणार आहे. विशेषतः विविध क्षेत्रातील महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात राहणार आहे. यामध्ये शेतकरी (मासेमारी समुदाय ते पीकांच्या लागवडीमध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिला), शैक्षणिक क्षेत्र (विद्यार्थीनी, माता, शाळा आणि विद्यापीठातील शिक्षिका), बचत गट (अन्न आणि हातमाग क्षेत्रात कार्यरत महिला), उद्योजक, खासगी आणि सरकारी क्षेत्रातील महिला कर्मचारी त्याचबरोबर सैन्य, नौदल आणि पोलिस कर्मचारी या क्षेत्रातील महिलांचा समावेश राहणार आहे.

## आयसीआयसीआय लोम्बार्ड अभियंत्यांना प्रशिक्षण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सध्या सुरू असलेल्या झिरो फॅटॅलिटी कॉरिडॉर (ZFC) उपक्रमांतर्गत, सेव्हलाइफ फाउंडेशनने २० जानेवारी २०२६ रोजी मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अभियंते प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली. या उपक्रमाचा उद्देश उच्च-जोखीम असलेल्या रस्ते कॉरिडॉरमध्ये सुरक्षा पद्धती मजबूत करून टाळता येण्याजोग्या रस्ते अपघातातील मृत्यू कमी करणे आहे. आयसीआयसीआय लोम्बार्डच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) कार्यक्रमांतर्गत समर्थित, प्रशिक्षणात सुरक्षित रस्ते कार्यस्थळ व्यवस्थापनाचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पैलू समाविष्ट होते, ज्याचा उद्देश सक्रिय



बांधकाम क्षेत्रांमध्ये सुरक्षा मानके सुधारणे आणि अपघाताचे धोके कमी करणे हा होता. या कार्यक्रमाला एमएसआरडीसीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती शैलजा पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमात बोलताना त्या म्हणाल्या, "रस्ता सुरक्षा व्यवस्थापनात प्रत्यक्ष कृती अत्यंत महत्त्वाची आहे.

## विशेष एसुस लॅपटॉप ऑफर्ससह प्रजासत्ताक दिन करा साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तैवानी तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी एसुस, आपल्या लॅपटॉपच्या विस्तृत श्रेणीवर आकर्षक ऑफर्स देऊन भारताच्या प्रजासत्ताक दिनाचा उत्साह साजरा करत आहे. प्रजासत्ताक दिनाच्या सेलचा एक भाग म्हणून, ग्राहक उच्च-कार्यक्षमतेच्या गेमिंग मशीनपासून ते आकर्षक आणि हलक्याफुलक्या उत्पादकता उपकरणांपर्यंतच्या अत्याधुनिक एसुस लॅपटॉपसह आपला डिजिटल अनुभव उन्नत करू शकतात. या ऑफर्समध्ये रॉग, टफ विवोबुक आणि ज़ेनबुक सिरीजसह एसुसच्या लोकप्रिय उत्पादन श्रेणींचा समावेश आहे. या मर्यादित कालावधीच्या उत्सवी सेलदरम्यान, ग्राहक निवडक एसुस लॅपटॉपवर १९% पर्यंत बचत करू शकतात, ज्यामुळे प्रगत तंत्रज्ञान आणि सर्वोत्तम कार्यक्षमतेमध्ये गुंतवणूक करण्याची ही एक आदर्श वेळ आहे. या विशेष प्रजासत्ताक दिनाच्या ऑफर्स २६ जानेवारी २०२६ पर्यंत रिलायन्स डिजिटल, क्रोमा आणि विजय सेल्ससह




प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स रिटेल चेनमध्ये उपलब्ध असतील, ज्यामुळे देशभरातील ग्राहकांना सहज उपलब्धता सुनिश्चित होईल. ग्राहक सर्व प्लॅटफॉर्मवर एसुस एआईओ पीसी, कंझ्युमर आणि गेमिंग डीटी आणि ॲक्सेसरीजवर देखील ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात. उत्सवी सवलतींव्यतिरिक्त, एसुसचे ग्राहक निवडक मॉडेल्सवर नो कॉस्ट ईएमआई , कमी किमतीचा ईएमआई आणि आईबीडी पर्यायांसह आकर्षक बँक आणि कार्ड फायनान्स ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात.

अधिक मूल्य वाढवण्यासाठी, एसुस ऑफर कालावधीत एसुस प्रोमो वेबसाइटद्वारे रिडीम करता येणाऱ्या, फक्त ₹९९ पासून सुरू होणाऱ्या विस्तारित वॉरंटी योजना आणि विशेष भेटवस्तू देखील देत आहे.

## अझीम प्रेमजी विद्यापीठात शिक्षकांसाठी पदव्युत्तर पदविका प्रवेश सुरू

Azim Premji University

**अभ्यासक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये**

- एक वर्षाचा, अर्धवेळ मिश्र स्वरुपाचा पदविका अभ्यासक्रम (हायब्रीड फॉरमॅट).
- ऑनलाइन वर्ग आणि बंगळूरु विद्यापीठ प्रांगणात प्रत्यक्ष सत्रांचा समावेश.
- प्रत्येक पदविका अभ्यासक्रमात प्रत्येकी १२ आठवड्यांच्या चार प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा समावेश.
- पूर्ण पदविका अभ्यासक्रम किंवा वैयक्तिक प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी नोंदणी करण्याची लवचिक सुविधा.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अझीम प्रेमजी विद्यापीठाने त्यांच्या बंगळूरु विद्यापीठ प्रांगणात (कॅम्पस) शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू केल्याची घोषणा केली आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण (अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन) अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदविका, शैक्षणिक मूल्यमापनामध्ये पदव्युत्तर पदविका, अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांना शिकवण्यासाठी पदव्युत्तर पदविका आदी अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख १२ फेब्रुवारी २०२६ आहे

हा एक वर्षाचा अर्धवेळ पदविका अभ्यासक्रम असून, यामध्ये सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक शिक्षणाचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम मिश्र स्वरुपात (ऑनलाइन आणि कॅम्पसमध्ये प्रत्यक्ष सत्रे) राबवला जाईल. नियमित शालेय क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांच्या उच्च-गुणवत्तेच्या व्यावसायिक विकासासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या लवचिक रचनेमुळे कार्यरत शिक्षकांना आपले काम सांभाळून शिक्षण घेणे शक्य होणार आहे.

हा पदविका अभ्यासक्रम शिक्षण क्षेत्रातील कार्यरत शिक्षकांसाठी तयार करण्यात आला आहे. त्यासाठी शालेय शिक्षक आणि शिक्षक-प्रशिक्षक, विशेष शिक्षक, शालेय पदाधिकारी, सरकारी संस्था, खासगी संस्था किंवा शालेय प्रणालीशी संबंधित स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक अर्ज करू शकतात. अर्जदारांकडे किमान दोन वर्षांचा संबंधित कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशनचे संचालक अंकुर मदन म्हणाले, "हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना पूर्व प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, अध्ययन अक्षमता आणि मूल्यमापन यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टीकोन प्रदान करतात. हे अभ्यासक्रम अशा प्रकारे डिझाईन करण्यात आले आहेत की, ज्यामुळे कार्यरत शिक्षक/शिक्षणतज्ज्ञांना त्यांचे शिक्षण मुले आणि सहकाऱ्यांबरोबरच्या दैनंदिन व्यवहारात वापरता येईल. तसेच, स्वतःच्या कामातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा चिकित्सकपणे विचार करण्यास आणि त्यांची उत्तरे शोधण्यासही हे अभ्यासक्रम त्यांना प्रोत्साहित करतात."

## बॉन्डटाइटने रणबीर कपूरसोबत ॲडहेसिव्हच्या भारतीय बाजारपेठेची पुनर्रचना करण्यासाठी घेतली धाडसी झेप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सुमारे ३० वर्षांहून अधिक कालावधीचा वारसा लाभलेल्या भारतातील सर्वात विश्वासार्ह ॲडहेसिव्ह (गोंद) ब्रँडपैकी एक असलेल्या ॲस्ट्रल लिमिटेडच्या बॉन्डटाइटने आपल्या नवीन ब्रँड मोहिमेच्या शुभारंभासह एक महत्त्वपूर्ण झेप घेतली आहे—भारतीय गोंद बाजारात दर्जेदार ब्रँड म्हणून आपले स्थान अधिक दृढ करण्याच्या दिशेने टाकलेले हे एक निर्णायक पाऊल




आहे. या धोरणात्मक पावलाचा एक भाग म्हणून, बॉन्डटाइटने सुप्रसिद्ध अभिनेता रणबीर कपूर याची ब्रँड चेहरा म्हणून निवड केली आहे. विश्वासार्हता, अष्टपैलुत्व आणि पिढ्यानपिढ्या असलेले व्यापक आकर्षण यांसाठी ओळखला जाणारा रणबीर कपूर बॉन्डटाइटच्या ब्रँड मूल्यांशी सुसंगत असा चेहरा ठरतो आणि विश्वास व सापेक्षतेची ठोस भावना निर्माण करतो. ब्रँडसोबतच्या या हातमिळवणीमुळे सर्व प्रकारच्या चिकटविण्याच्या (ॲडहेसिव्ह) गरजांसाठी समानार्थी नाव बनण्याच्या बॉन्डटाइटच्या दृष्टीकोनाला नवे बळ मिळते. आगामी कॅम्पेनमध्ये लाकडासाठी वापरण्यात येणाऱ्या गोंद घटकांवर, म्हणजेच वूड ॲडहेसिव्हवर, संवादाचा केंद्रबिंदू ठेवण्यात आला आहे. ही अशी एक श्रेणी (कॅटेगरी) आहे जी ब्रँडसाठी मजबूत चालना देणारी ठरते. लाकडासाठी वापरण्यात येणाऱ्या ॲडहेसिव्ह व्यतिरिक्त, बॉन्डटाइटकडे इपोक्सी आणि सायनोएक्रिलेट (जलद) ॲडहेसिव्हचा भक्कम पोर्टफोलिओही आहे, जो उद्योग, व्यवसाय आणि घरांमधील निर्मिती व दुरुस्तीच्या विविध गरजा प्रभावीपणे पूर्ण करतो. “३ दशकांहून अधिक काळ बॉन्डटाइटने कामगिरी आणि सातत्य यांच्या जोरावर बाजारपेठेचा विश्वास संपादन केला आहे. एका सशक्त सेलिब्रिटी भागीदारीच्या पाठबळासह सादर करण्यात आलेले हे नवीन कॅम्पेन, विशेषतः पांढऱ्या गोंद (ॲडहेसिव्ह) विभागातील विकासाला गती देण्यासाठी आमचा नव्याने निर्माण झालेला उत्साह आणि आत्मविश्वास अधोरेखित करते.




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६









# नवनिर्वाचित नगरसेवक सनी निम्हण यांनी घेतली विरोधकांची भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

निवडणूक म्हटलं की प्रतिस्पर्धी उमेदवावर टीका करायची, मात्र त्या पलीकडे जाऊन निवडणूक संपल्यावर दोन परस्पर विरोधी निवडणूक लढवलेले उमेदवार एकमेकांना भेटतात हे अलीकडे दुर्मिळ झाले आहे. मात्र लढाई संपली आता सर्वजण एकत्र येऊ... आपल्या औंध बोपोडीला विकासात अग्रेसर ठेऊ, असे म्हणत औंध - बोपोडी प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेवक चंद्रशेखर उर्फ सनी निम्हण यांनी घेतली विरोधकांची भेट घेतली. या विषयी बोलताना सनी निम्हण म्हणाले, निवडणूका येतात जातात. निवडणुकीची लढाई हि व्यक्तीशी नसून विचारांची लढाई असते असे मी मानतो. हाच विचार पुढे नेत आज निवडणुकीच्या धामधुमीनंतर प्रकाशजी ढोरे यांची सदिच्छा भेट घेतली. या प्रसंगी विनायक रणपिसे उपस्थित होते. येत्या काळात औंध बोपोडी परिसराचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी विचारांची देवाणघेवाण झाली. या परिसराविषयी त्यांचा ध्यास आणि कार्य पाहता पुढील काळात औंध बोपोडीच्या विकासासाठी त्यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन मोलाचे ठरणार आहे. शेवटी वैचारिक भूमिका जरी वेगळी असली तरी औंध बोपीडीच्या विकासासाठी आपण सर्व मतभेद बाजूला ठेऊन एकत्र यायला पाहिजे असे मानणारा मी एक कार्यकर्ता आहे.

सगळ्यांना सोबत घेऊन सर्वांच्या सहभागातून विकास हि स्वर्गीय कार्यसम्राट आमदार विनायक निम्हण यांची शिकवण अशाच संस्कारांची नित्य प्रेरणा देत असते असेही सनी निम्हण यांनी नमूद केले.



# उत्तम कथा, स्टारकास्ट असलेला "मन आतले मनातले" चित्रपट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आशयसंपन्न कथा असलेल्या मराठी चित्रपटांमध्ये आता आणखी एका चित्रपटाची भर पडणार आहे. उत्तम स्टारकास्ट असलेला मन आतले मनातले हा चित्रपट १३ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले. सूर्य फिल्म वर्ल्ड प्रस्तुत "मन आतले मनातले" या चित्रपटाची निर्मिती सुरेन महापात्रा यांनी केली आहे. सुरेन महापात्रा यांनी चित्रपटाचं कथा आणि पटकथा लेखन, तर संवादलेखन मनोज सुधाकर येऊनकर यांनी केले आहे. तर जेम्स अँथनी यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. अभिजित मजुमदार यांनी संगीत दिग्दर्शन, डॉ. सुनंदा डिवरे पळवणकर यांनी गीतलेखन केलं आहे. सुदर्शन



सेनापती यांनी छायांकन, मलया आणि बिपिन यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. चित्रपटात अभिनेत्री मानसी नाईक अभिनेता सुरेन महापात्रा, अभिनेता उपेंद्र लिमये, ऋतुराज फडके, संदीप गायकवाड, कमलेशन सावंत, अरूण नलावडे, यतीन कार्येकर, सिया पाटील, राजेश आहेर, विनित भोंडे अशी तगडी स्टारकास्ट आहे. अतिशय नावीन्यपूर्ण कथा, उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात आहे. त्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांचं मनोरंजन करणारा आहे.

# ओप्पो इंडियाची प्रीमियम रेनो १५ सिरीज भारतात लाँच

## २०० एमपी कॅमेरा आणि एआय वैशिष्ट्ये ठरली आकर्षण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ओप्पो इंडिया ने आज आपली बहुप्रतिक्षित प्रीमियम रेनो १५ सिरीज भारतात लाँच केली. या सिरीजमध्ये रेनो १५ प्रो ५जी, रेनो १५ प्रो मिनी ५जी आणि रेनो १५ हे तीन स्मार्टफोन सादर करण्यात आले आहेत. तरुण प्रवासी, कंटेंट क्रिएटर्स आणि फोटोग्राफीप्रेमी यांना लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेल्या या सिरीजमध्ये प्रगत कॅमेरा सिस्टम, एआय-संचालित एडिटिंग टूल्स आणि आकर्षक, स्लिम डिझाइनचे संयोजन आहे.

रेनो १५ प्रो आणि रेनो १५ प्रो मिनी या दोन्ही मॉडेल्समध्ये २०० एमपी अल्ट्रा-क्लीअर मेन कॅमेरा देण्यात आला असून, ५० एमपी ३.५x ऑप्टिकल झूम लेन्स, १२०x डिजिटल झूम आणि प्युअरटोन इमेजिंग



टेक्नॉलॉजीचा समावेश आहे. यामुळे प्रवासादरम्यान लँडस्केप्सपासून क्लोज-अप पोर्ट्रेट्सपर्यंत उच्च दर्जाची छायाचित्रण शक्य होते. एआय एडिटर ३.०, एआय पोर्ट्रेट ग्लो, एआय रिफ्लेक्शन रिमूव्हर आणि एआय इरेजरसारखी वैशिष्ट्ये फोटो एडिटिंग अधिक सोपी व प्रभावी बनवतात. व्हिडिओ क्रिएटर्ससाठी, रेनो १५ प्रो सिरीजमध्ये सर्व कॅमेऱ्यांवर ४के ६०एफपीएस एचडीआर व्हिडिओ रेकॉर्डिंग, ईआयएस २.० आणि ऑप्टिकल इमेज स्टॅबिलायझेशनचा सपोर्ट आहे. ड्युअल-व्ह्यू व्हिडिओ आणि मल्टी-आउटपुट कॅप्चरमुळे एकाच वेळी विविध अँगल्समधून शूटिंग शक्य होते, ज्यामुळे व्लॉगिंग आणि सोशल मीडिया कंटेंट अधिक आकर्षक बनतो. डिझाइनच्या बाबतीत, रेनो १५ सिरीज अल्ट्रा-स्लिम आणि हलक्या बॉडीसह सादर करण्यात आली आहे. रेनो १५ प्रो मध्ये ६.७८-इंचाचा अॅमोलेड डिस्प्ले असून स्क्रीन-टू-बॉडी रेशो ९५.५ टक्के आहे. रेनो १५ प्रो मिनी हा कॉम्पॅक्ट फॉर्म फॅक्टरमध्ये फ्लॅगशिप परफॉर्मन्स देणारा फोन असून त्याचे वजन फक्त १८७ ग्रॅम आहे. संपूर्ण लाइनअपमध्ये १२० एचझेड अॅडॉप्टिव्ह रिफ्रेश रेट, एफएचडी+ रिझोल्यूशन आणि १,८०० निट्सपर्यंत ब्राइटनेस मिळतो.

बॅटरी आणि चार्जिंगमध्येही ओप्पोने विशेष लक्ष दिले आहे. रेनो १५ प्रो मध्ये ६५०० एमएएच बॅटरी, ८० वॅट सुपरव्हूक फास्ट चार्जिंग आणि ५० वॅट वायरलेस चार्जिंग देण्यात आले आहे. केवळ १० मिनिटांच्या चार्जिंगमध्ये अनेक तासांचा वापर शक्य असल्याचा कंपनीचा दावा आहे.

किंमतीच्या बाबतीत, रेनो १५ प्रो ६७,९९९ रुपयांपासून, रेनो १५ प्रो मिनी ५९,९९९ रुपयांपासून आणि रेनो १५ ४५,९९९ रुपयांपासून उपलब्ध आहे. ही सिरीज अॅमेझॉन, फ्लिपकार्ट, ओप्पो ई-स्टोअर आणि प्रमुख रिटेल आउटलेट्समध्ये आकर्षक ऑफर्ससह विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## एएसएसआयची वार्षिक परिषद पुण्यात

पुणे (आरंभ पर्व) : असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडिया (एएसएसआय) यांच्या ३९ व्या वार्षिक परिषदेचे आयोजन पुणे असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स (पीएएसएस) तर्फे करण्यात आले आहे. ही परिषद २२ ते २५ जानेवारी २०२६ दरम्यान पुण्यातील जे. डब्ल्यू. मेरियट हॉटेल येथे होणार आहे. या परिषदेत देश-विदेशातील सुमारे १,२०० स्पाईन सर्जन्स सहभागी होण्याची अपेक्षा असून, मणक्याशी संबंधित आजार, आधुनिक निदान व उपचार, रोबोटिक व एंडोस्कोपिक स्पाईन शस्त्रक्रिया, तसेच शस्त्रक्रिया न करता दिल्या जाणाऱ्या उपचार पद्धतींवर चर्चा होणार आहे. अमेरिका, ब्रिटन, कोरिया, सिंगापूरसह नेपाळ व श्रीलंकेतील प्रतिनिधी प्रथमच एकत्र येणार असल्याने ही परिषद विशेष महत्त्वाची ठरणार आहे.

## रेशमा खान यांची संयोजकपदी निवड



पुणे (आरंभ पर्व) : नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीच्या पश्चिम महाराष्ट्र अर्थात पुणे विभागाच्या संयोजक ( कन्वेनर ) पदावर कोंढवा येथिल सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती रेशमा खान यांची निवड करण्यात आली आहे. नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या अध्यक्षतेखालील पार पडलेल्या विशेष बैठकीत खान यांची निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी राहुल डंबाळे यांचेसह समीर पटेल , अॅड. दानीश पठाण , असिफ खान , निलोफर मुल्ला , प्रभु सुनगर आदी पदाधिकारी उपस्थित होते. अल्पसंख्याक समुदायाच्या अधिकारांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून रेशमा खान परिचित असुन त्यांच्या निवडीचे सर्वस्तरातुन स्वागत करण्यात येत आहे.

## २२८ मतांनी सूरज लोखंडे विजयी

पुणे (आरंभ पर्व) : कसबा-विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत झालेल्या प्रभाग क्रमांक २८ मध्ये यंदाच्या निवडणुकीतील सर्वाधिक अटीतटीची लढत पाहायला मिळाली. शेवटच्या फेरीपर्यंत श्वास रोखून धरायला लावणाऱ्या या रणसंग्रामात राष्ट्रवादी काँग्रेसचे सूरज नथुराम लोखंडे यांनी भारतीय जनता पक्षाच्या विनया प्रसाद बहुलीकर यांचा अवघ्या २२८ मतांनी पराभव करत विजय खेचून आणला. सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात झाल्यापासून प्रभाग २५ (शनिवार पेठ - फुले मंडई) आणि प्रभाग २७ (नवी पेठ - पर्वती) मध्ये भाजपने आपले वर्चस्व राखले होते. या दोन्ही प्रभागांतील चारही उमेदवार निवडून आल्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह होता. मात्र, सायंकाळी साडेचार वाजता जेव्हा प्रभाग २८ ची मतमोजणी सुरू झाली, तेव्हा 'जनता वसाहत - हिंगणे खुर्द' मधील कल वेगळा दिसू लागला.

# ग्रीनफिल्ड उत्पादन प्लांटमुळे मोल्डिंग सोल्यूशन्सच्या धोरणाला बळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मोल्डिंग सोल्यूशन्स या जागतिक अग्रणी कंपनीने भारतात आपल्या नवीन ग्रीनफिल्ड उत्पादन प्लांटचे अधिकृत उद्घाटन करत आंतरराष्ट्रीय उत्पादन व सेवा धोरण अधिक दृढ केले आहे. मॅनेर, फोबोहा, सिन्वेन्टिव्ह, थर्मोप्ले, गॅमाफ्लक्स आणि प्रियामस या ब्रँड्सच्या सहकार्याने उभारण्यात आलेला हा प्लांट कंपनीच्या दीर्घकालीन विकास धोरणातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. विशेषतः हॉट रनर सिस्टीम्स क्षेत्रातील जागतिक स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी ही गुंतवणूक मोलाची ठरणार आहे.

२० जानेवारी २०२६ रोजी




पारंपरिक भारतीय पद्धतीने 'इंडिया ग्रँड ओपनिंग' सोहळा पार पडला. त्यानंतर २१ जानेवारी रोजी ग्राहक व सहयोगींसाठी विशेष कस्टमर इव्हेंट आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये नवीन प्लांटमधील अत्याधुनिक तांत्रिक क्षमता, उत्पादन प्रक्रिया आणि सेवा सुविधांची माहिती देण्यात आली.

इंजेक्शन मोल्डिंग उपयोजनांसाठी भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी बाजारपेठ मानली जाते. या पार्श्वभूमीवर नवीन प्लांटमुळे मोल्डिंग सोल्यूशन्स भारतातील तसेच आशियातील ग्राहकांच्या अधिक जवळ पोहोचणार आहे. वितरणासाठी लागणारा कालावधी कमी करणे, उत्पादन क्षमता वाढवणे आणि विक्री-पश्चात सेवांमध्ये सुधारणा करणे, हा या गुंतवणुकीमागील मुख्य उद्देश आहे. जागतिक स्तरावर हॉट रनर सिस्टीम्सची बाजारपेठ अब्जावधी डॉलर्सची असून भारतातच तिचे मूल्य सुमारे २०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स असल्याचा अंदाज आहे.

कंपनीने आतापर्यंत ऑटोमोटिव्ह क्षेत्रात आपले भक्कम स्थान निर्माण केले असून, आता वैद्यकीय, आरोग्यसेवा, एफएमसीजी आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांमध्ये वेगाने विस्तार करण्याची संधी असल्याचे नेतृत्वाने स्पष्ट केले आहे. विशेषतः सिन्वेन्टिव्ह ब्रँडद्वारे अचूक मोल्डेड घटकांची वाढती मागणी कंपनीसाठी नवी दारे उघडत आहे.

# पहिल्याच दिवशी बार्शीत ४६ उमेदवारी अर्जांची विक्री

**बार्शी शहर (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद ६ गट आणि पंचायत समितीच्या १२ गणांसाठी निवडणूक होत आहे. या जागांसाठी शुक्रवारी (ता. १६) अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत ४६ अर्जांची विक्री झाली. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गणासाठी उपळाई (ठों) - ८, पांगरी - ७, पानगाव - १०, उपळे दुमाला - ५, मालवंडी - ८, शेळगाव (आर) - ८ या गटातून अशा पद्धतीने अर्जांची विक्री झाल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी एफ. आर. शेख यांनी

- **जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक**

दिली. अर्ज भरण्याची शेवटची मुदत बुधवारपर्यंत (ता. २१) आहे. तालुक्यात आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यातच खरी लढत होणार असून, दोन्हीही गटांत इच्छुकांची प्रचंड गर्दी दिसून येत आहे. दोनच दिवसांपूर्वी दोन्ही गटांकडून कार्यकर्त्यांचे मेळावे देखील घेण्यात आले आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी नेमके कोणाला तिकीट मिळणार, याकडे तालुक्यातील कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

# प्रभाग २८ मध्ये अॅड. प्रसन्नदादा जगताप यांचा विजय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक २८ मधील निवडणुकीत अॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी निर्णायक विजय मिळवत प्रतिस्पर्धी उमेदवारांचा पराभव केला. या विजयामुळे प्रभागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्ते व समर्थकांनी मोठ्या उत्साहात जल्लोष साजरा केला.

विजयानंतर अॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह विजय मिरवणूक काढली. "एकच वादा म्हणजे प्रसन्नदादा" अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.

यावेळी बोलताना कार्यकर्त्यांनी सांगितले की, सर्वांनी अपार परिश्रम घेतले, घरोघरी जाऊन जनतेशी संवाद साधला आणि विकासाचा संदेश पोहोचवला. अॅड प्रसन्नदादा जगताप यांच्या कार्याबरोबरच कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे विजय शक्य झाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

विजयानंतर मनोगत व्यक्त करताना अॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी



- **जनतेला समर्पित विजय, जनतेच्या विकासासाठी कटिबद्ध; अॅड प्रसन्नदादा जगताप**
- **अवघड विजय खेचून आणला म्हणता केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले कौतुक**

प्रभाग क्रमांक २८ मधील जनतेचे आभार मानले. जनतेने दाखवलेल्या विश्वासाला पात्र ठरत प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध राहू, असे आश्वासन त्यांनी दिले. हा विजय प्रत्येक कार्यकर्त्याच्या कष्टांचा आणि जनतेच्या विश्वासाचा विजय असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# वडिलांना गुलालात पाहण्यासाठी चिरंजीव अनिकेत चव्हाण यांची मास्टरमाईंड खेळी यशस्वी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 33 मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे काकासाहेब चव्हाण यांनी दणदणीत विजय मिळवत राजकारणातील आपली पकड पुन्हा एकदा सिद्ध केली. या यशामागे पडद्यामागून सूत्रे हलवणारे प्रमुख शिल्पकार म्हणून त्यांचे चिरंजीव अनिकेत चव्हाण यांची भूमिका निर्णायक ठरली.

"काहीही करून वडिलांना गुलालात पाहायचे" हा निर्धार उराशी बाळगून अनिकेत चव्हाण यांनी केवळ काकासाहेबांसाठीच नव्हे, तर संपूर्ण पॅनल निवडून आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले. प्रचार नियोजन, कार्यकर्त्यांची मोट बांधणी, गावोगाव संपर्क, बैठका आणि कॅम्पिंगसंपूर्ण यंत्रणा त्यांनी स्वतः हाताळली.

या प्रयत्नांची सुरुवात विधानसभा निवडणुकीच्या आधीच झाली होती. त्या काळात काकासाहेबांना विधानसभा लढवण्यासाठी प्रेरणा देणे, युवा कार्यकर्त्यांना सक्रिय करणे



आणि संघटन मजबूत करणे यात अनिकेत व त्यांच्या सहकाऱ्यांचा मोठा वाटा होता. मात्र संधी न मिळाल्याने विधानसभा स्वप्न अधुरेच राहिले. तरीही काकासाहेबांनी संयम राखत पक्षनिष्ठेला प्राधान्य दिले. अनेक जण पक्ष सोडत असतानाही त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ठाम राहण्याचा निर्णय घेतला. महानगरपालिका निवडणुकीसाठी सुरुवातीला अनिकेत चव्हाण यांचे नाव आघाडीवर होते. मात्र बदलत्या परिस्थितीचा अचूक अंदाज घेत अखेरीस काकासाहेबांना उमेदवारी देण्याचा निर्णय झाला.

त्या क्षणापासून अनिकेत यांनी स्वतःपेक्षा वडिलांसाठी अधिक धाव घेतली..कार्यकर्ते जमवले, प्रचाराची दिशा ठरवली आणि शांत, संयमी पद्धतीने संपूर्ण मोहिम पुढे नेली. "विधानसभेला आमदार करण्याचे स्वप्न होते; आज वडिलांना नगरसेवक करत तो मार्ग अधिक प्रशस्त केला," अशी भावना यानिमित्त व्यक्त होत आहे.

राजकारण साम-दाम-दंड-भेदापुरते मर्यादित नसून प्रेम, संयम आणि शांततेनेही करता येते, हे अनिकेत चव्हाण यांनी दाखवून दिले.

> **विजयानंतर अनिकेत चव्हाण व त्यांचे बंधू अवधूत चव्हाण यांनी केलेले सेलिब्रेशन सर्वत्र चर्चेचा विषय ठरले. "कार्य चांगले असेल तर जनता नक्कीच पाठीशी उभी राहते. संयम आणि जिद्द महत्त्वाची. कधी वेळ लागतो, पण चांगले घडतेच," असे मत अनिकेत चव्हाण यांनी व्यक्त केले. पूर्ण पॅनल निवडून आणण्याचे स्वप्न यावेळी पूर्ण झाले नसले, तरी या प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सातत्याने कार्यरत राहू, असा निर्धार त्यांनी यावेळी बोलून दाखवला.**



# पाणी प्रश्न सोडवण्यावर भर

## मा. श्री. राजाभाऊ लायगुडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 34 मधून भाजपकडून विजयी झालेले राजाभाऊ लायगुडे उमेदवार यांच्या विजयानिमित्त धायरी परिसरात उत्साही वातावरणात विजयी रॅली काढण्यात आली.

धायरी फाटा ते धायरी गाव या मार्गावर निघालेल्या या रॅलीत कार्यकर्ते आणि नागरिकांनी गुलालाची उधळण करत आनंद साजरा केला. ढोल-ताशांच्या आवाजात आणि घोषणाबाजीमुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले होते. या रॅलीत युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सलग तिसऱ्यांदा मिळालेल्या विजयामुळे समर्थकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. रॅलीदरम्यान अनेक ठिकाणी नागरिकांनी राजाभाऊ लायगुडे यांचे पुष्पहार घालून स्वागत केले आणि शुभेच्छा दिल्या.

- **लायगुडे यांच्या हॅट्ट्रिक विजयाची गुलालाची उधळण करत विजयी रॅली**

विजयानंतर बोलताना राजाभाऊ लायगुडे यांनी सर्व मतदार बंधू-भगिनींचे मनापासून आभार मानले. ही निवडणूक जनतेच्या पाठिंब्यामुळेच जिंकता आली, असे त्यांनी सांगितले. आगामी काळात प्रभागातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता यांसारख्या दैनंदिन समस्यांवरही लक्ष दिले जाईल, असे ते म्हणाले.

कोणताही भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन प्रभागाचा विकास करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी नागरिकांना दिला.

भारतीय जनता पार्टीच्या या विजयामुळे धायरी परिसरातील नागरिकांनी पुढील काळात विकासाची आशा निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली.

### कोणतेही आव्हान वाटले नाही : लायगुडे

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पॅनलची चर्चा होत असताना भाजपने एकतर्फी विजय मिळवला. त्याबद्दल बोलताना ते म्हणाले ही सर्व उमेदवार हे ताकदीचे होते, मात्र आमचे काम बघून लोकांनी मतदान केल्यामुळे आव्हान काहीच वाटले नाही असे त्यांनी सांगितले. यावेळी सर्व यावेळी वरिष्ठ नेत्यांचे व कार्यकर्त्यांचे लायगुडे यांनी आभार मानले.**

# संयम, निष्ठा आणि संघर्षातून मिळवले यश

## काकासाहेब चव्हाण यांचा विश्वासाचा विजय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राजकारणात संधी मिळाली नाही म्हणून पक्ष सोडण्याची प्रवृत्ती सध्या सर्वत्र पाहायला मिळते. मात्र अशा परिस्थितीतही पक्षाशी एकनिष्ठ राहून, संयम आणि सातत्याने काम करणाऱ्या नेत्यांना अखेर यश मिळते, हे प्रभाग क्रमांक ३३ च्या पुणे महानगरपालिका निवडणुकीतून स्पष्ट झाले.

या निवडणुकीत सोपान उर्फ काकासाहेब चव्हाण यांनी मिळवलेला विजय हा केवळ निवडणुकीचा नाही, तर विश्वास, निष्ठा आणि संघर्षाचा विजय मानला जात आहे.

प्रभाग ३३ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) आणि भारतीय जनता पार्टी यांच्यात अटीतटीची लढत पाहायला मिळाली. राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) कडून काकासाहेब चव्हाण, अनिता इंगळे, संदीप मते आणि रश्मी घुले हे उमेदवार रिंगणात होते.

जोरदार प्रचार, मतदारांमध्ये निर्माण झालेली उत्सुकता यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली.

अखेर मतदारांनी विकासाचा विचार करत दोन राष्ट्रवादी कॉंग्रेस दोन भाजप असा कौल दिला.

त्यानुसार काकासाहेब चव्हाण आणि अनिता इंगळे यांनी विजय मिळवला, तर इतर त्यांच्या उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला.

काकासाहेब चव्हाण यांचा हा विजय विशेष मानला जात आहे. विधानसभेची तयारी पूर्ण असूनही पक्षाने संधी न दिल्यानंतरही त्यांनी पक्ष सोडला नाही. उलट पक्षाच्या अधिकृत उमेदवारासाठी त्यांनी प्रामाणिकपणे काम केले. आज विधानसभेतील जवळपास सर्वच इच्छुकांनी पक्षांतर केले असताना काकासाहेब चव्हाण यांनी मात्र शरदचंद्र पवार पक्षात ठाम राहून निष्ठेचा आदर्श निर्माण केला.

विधानसभेला हुकलेली संधी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून पक्षाने आणि मतदारांनी भरून काढली, अशी भावना व्यक्त होत आहे.

तब्बल २४ वर्षांनंतर काकासाहेब चव्हाण पुन्हा पुणे महानगरपालिकेत सदस्य म्हणून जाणार आहेत. यापूर्वी २००२ मध्ये ते पुणे महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून गेले होते. दीर्घ संघर्षानंतर मिळालेल्या या यशामुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे.




विजयानंतर अनेक जुने कार्यकर्ते भावूक झाले. अनेक पराभव पचवत, कोणतीही अपेक्षा न ठेवता पक्षासाठी काम करणाऱ्या काकासाहेब चव्हाण यांना आता पक्षात मोठी संधी मिळावी, अशी ठाम मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे.

विजयानंतर बोलताना काकासाहेब चव्हाण यांनी मतदारांचे आभार मानत, "प्रभाग क्रमांक ३३ च्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करणार असून जनतेच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही," असे आश्वासन दिले. मात्र ह्या विजयाने आनंद मिळाला नसल्याची भावना व्यक्त केली. कारण त्यांचे दोन सहकारी पराभूत झाले. आम्ही पूर्ण तयारी केली होती मात्र मतदारांचा कौल मान्य असून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले.

# समस्या प्राधान्याने सोडवण्याचा प्रयत्न करू – सागर भूमकर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३४ मधून भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार जयश्री सत्यवान भूमकर यांनी सर्वाधिक मतांनी शानदार विजय मिळवला आहे. या विजयामुळे प्रभागात भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विजयानंतर फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष करण्यात आला. अत्यंत चुरशीची आणि अटीतटीची वाटणारी ही निवडणूक प्रत्यक्ष निकालाच्या दिवशी मात्र एकतर्फी ठरली. मतमोजणीच्या प्रत्येक फेरीत जयश्री भूमकर यांनी आघाडी कायम राखत मोठ्या फरकाने विजय मिळवला. हा विजय म्हणजे प्रभागातील नागरिकांनी भाजपच्या विकासाभिमुख



धोरणावर व्यक्त केलेला ठाम विश्वास असल्याचे बोलले जात आहे.

विजयानंतर बोलताना जयश्री भूमकर म्हणाल्या, "या प्रभागातील प्रत्येक नागरिकाने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो मी विकासकामांच्या माध्यमातून सार्थ ठरवेन. पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता, आरोग्य सेवा, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा यांसह सर्व मूलभूत प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करेन."

या निवडणुकीत 'किंगमेकर'ची भूमिका बजावणारे त्यांचे सुपुत्र सागर भूमकर यांनीही विजयानंतर प्रतिक्रिया देताना मतदारांचे आभार मानले.

"हा विजय केवळ आमचा नसून, प्रभाग क्रमांक ३४ मधील प्रत्येक मतदाराचा आहे. जनतेसाठी कायमस्वरूपी कार्यरत राहणे हेच आमचे ध्येय आहे.

नागरिकांच्या समस्या ऐकून त्या सोडवण्यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, प्रचार काळात तसेच निवडणूक प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्व मतदार बंधू-भगिनी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे जयश्री भूमकर व सागर भूमकर यांनी मनःपूर्वक आभार मानले.

हा विजय प्रभाग क्रमांक ३४ मध्ये विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरेल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# सामाजिक आणि राजकीय कार्याबद्दल कौतुकास्पद प्रमाणपत्र प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मध्य प्रदेशातील वरिष्ठ आणि आदरणीय पोलीस अधिकारी श्री. वरुण कपूर यांनी रवींद्र ठाकूर यांना सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल कौतुकास्पद प्रमाणपत्र प्रदान केले. श्री. ठाकूर यांच्या सामाजिक सेवा, सकारात्मक सामाजिक उपक्रम आणि सार्वजनिक कल्याणकारी कार्यातील योगदानाबद्दल हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या प्रसंगी, श्री. वरुण कपूर यांनी रवींद्र ठाकूर यांच्या कार्याचे कौतुक केले आणि म्हटले की, त्यांची संवेदनशीलता, समर्पण आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. श्री. रवींद्र ठाकूर भविष्यातही अशाच समर्पणाने आणि वचनबद्धतेने समाज



आणि राज्याच्या कल्याणासाठी काम करत राहतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. प्रमाणपत्र मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना रवींद्र ठाकूर म्हणाले की, या सन्मानामुळे त्यांना अधिक जबाबदारी आणि प्रेरणा घेऊन समाजसेवा करण्यास सक्षम केले जाईल.

## थोडक्यात पण महत्वाचे

### माजी विद्यार्थी संघातर्फे क्रांतिज्योती विद्यालय चित्रपटाच्या 'शो' चे आयोजन



**सिंहगड (आरंभ पर्व) : खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे महात्मा गांधी विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघातर्फे शशिकांत किवळे व प्रवीण पारगे यांनी माजी विद्यार्थी व आजी-माजी शिक्षक-शिक्षकेतर सहका-यांसाठी क्रांतिज्योती मराठी माध्यम चित्रपटाचा खास शो चे आयोजन सिंहगड रोड वरील 'अभिरुची सिटी प्राईड' येथे आयोजन करण्यात आले होते.यावेळी चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक हेमंत ढोमे,कलाकार अमेय वाघ,धनंजय देशपांडे,व आजी'माजी शिक्षक उपस्थित होते.महात्मा गांधी विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी क्रांतिज्योती विद्यालय चित्रपटाचा विशेष शो माजी विद्यार्थ्यांसाठी लावून सामाजिक जाणीव ठेवल्याबद्दल हेमंत ढोणे व अमेय वाघ यांनी आभार व कौतुक केले.**



### भूमाता फाउंडेशनतर्फे अनोखे हळदीकुंकू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भूमाता ब्रिगेड व भूमाता फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष तृप्ती देसाई यांच्या पुढाकारातून दरवर्षी मकर संक्रांतिनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या अनोख्या हळदीकुंकवाचा कार्यक्रम यंदाही मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विधवा महिलांसह सर्वच महिलांना हळदीकुंकवाचा समान मान देण्यात येतो. २०१६ पासून सुरू असलेल्या या समारंभाला पहिल्या वर्षी मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले होते. "विधवा महिलांना अशा कार्यक्रमाला का बोलावले जाते?" असा प्रश्न उपस्थित करत टीका झाली होती.

- **१५०० महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**

मात्र तृप्ती देसाई यांनी सातत्याने जनजागृती केली. त्यातूनच आज हा उपक्रम एका मोठ्या कुटुंबात परिवर्तित झाला असून महिलांमध्ये समानतेची भावना अधिक दृढ झाली आहे. "समानता आणि महिला सबलीकरणासाठी काम करताना कोणताही भेदभाव होता कामा नये. आणि तो भेदभाव महिलांमध्येच होत असेल, तर तो थांबवणे आपल्या हातात आहे," हाच या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे तृप्ती देसाई यांनी यावेळी स्पष्ट केले.

कार्यक्रमात सर्व महिलांनी प्रथम विठ्ठल-रखुमाई यांची सामूहिक पूजा केली. त्यानंतर एकमेकींना तिळगूळ देत स्नेहवर्धन करण्यात आले. भूमाता फाउंडेशनच्या वतीने उपस्थित प्रत्येक महिलेला वाणही देण्यात आले.

# ॲसीडयुक्त सांडपाण्याने शेती, आरोग्य व पर्यावरण धोक्यात

**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**

पारनेर तालुक्यातील माळकुप येथील एका कारखान्यातून निघणारी ॲसीडयुक्त मळी व दूषित सांडपाणी शासन नियमांचे उल्लंघन करून खुलेआम शेतजमिनीत, माळरानात तसेच वनविभागाच्या क्षेत्रात सोडण्यात येत असल्याचा गंभीर आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. या ॲसीडयुक्त केमिकलमुळे अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून जमिनीतील पाण्याचे क्षार प्रमाण वाढले आहे. परिणामी शेती नापीक होत चालली असून पिकातील धान्याचे प्रमाण घटत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या दूषित सांडपाण्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्यावर भयानक परिणाम होत आहे. दमा, बी.पी., कॅन्सर यासारख्या दुर्धर आजारांचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच



पशुधनालाही विविध आजारांना सामोरे जावे लागत असून काही शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आल्याचेही गंभीर वास्तव समोर येत आहे. या संपूर्ण प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर व नाशिक विभागाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देण्यात आली आहे. मात्र, संबंधित कारखान्याची शासन नियमानुसार प्रत्यक्ष पाहणी न करता नियमबाह्य अहवाल पाठविण्यात आल्याचा आरोप समितीने केला आहे.

# प्रभाग क्रमांक ३४ मध्ये हरिभाऊंचा पुन्हा डंका

## प्रभाग क्रमांक ३४ च्या सर्वांगीण विकासासाठी परिश्रम घेऊ : हरिदास चरवड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३४ मधील अत्यंत लक्षणीय व चुरशीच्या लढतीत नभारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांनी मोठ्या मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला. या विजयात भाजपचे उमेदवार हरिदास चरवड यांनी आपला दबदबा सिद्ध करत पुन्हा एकदा विजयाचा डंका वाजवला.

अत्यंत अटीतटीची वाटणारी ही निवडणूक एकतर्फी जिंकत हरिभाऊंनी आपले कर्तृत्व आणि जनतेचा विश्वास अधोरेखित केला. विजयानंतर प्रभागात मोठ्या उत्साहात जल्लोष करण्यात आला.

कार्यकर्त्यांनी डीजे, ढोल-ताशे व हलगीच्या गजरात आनंद साजरा केला. सामान्यतः संयमी स्वभावासाठी ओळखले जाणारे हरिभाऊ या आनंदाच्या क्षणी दंड थोपटत सेलिब्रेशनमध्ये सहभागी झाले.



या विजयाचे श्रेय हरिदास चरवड यांनी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना व मतदारांना दिले. ते म्हणाले की, उद्यापासूनच विकासकामांना सुरुवात केली जाईल. या प्रभागात समाविष्ट असलेल्या सर्व गावांमध्ये भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यावर आमचा भर राहणार असून, शहराच्या धर्तीवर हा प्रभाग आदर्श प्रभाग म्हणून विकसित करण्याचा संकल्प करण्यात येणार आहे.

तसेच, ही निवडणूक जाहीर झाल्यापासूनच मला विजयाचा पूर्ण आत्मविश्वास होता, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. पुढील निवडणुकीत यापेक्षाही अधिक मताधिक्य मिळवण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या विजयामुळे प्रभागातील नागरिकांमध्ये नव्या अपेक्षा निर्माण झाल्या असून पाणीपुरवठा, रस्ते, वीज, स्वच्छता व आरोग्य सुविधांबाबत तातडीने निर्णय घेतले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. जनतेशी सातत्याने संवाद ठेवत पारदर्शक कारभार करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा भव्य विजय उत्सव वडगाव चौकात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# भाजपच्या विजयामागील किंगमेकर : यशवंत लायगुडे

## स्थायी समितीमध्ये समाविष्ट भागातील लोकप्रतिनिधींना स्थान द्या : यशवंत लायुगडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मोठे यश मिळाले असून, प्रभाग क्रमांक ३५ व ३४ मधील विजयामागे पडद्यामागून महत्त्वाची भूमिका बजावणारे नाव म्हणजे मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे. युवा, तडफदार आणि शांत स्वभावाचे नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या यशवंत लायगुडे यांनी या निवडणुकीत संघटन कौशल्याचा उत्तम नमुना दाखवला.

निवडणुकीपूर्वी भाजपकडून मंडलाध्यक्ष पदाच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या होत्या.



त्यामध्ये यशवंत लायगुडे यांच्याकडे प्रभाग क्रमांक ३५ व ३४ ची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली होती.

ही जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी पदाधिकारी निवड, कार्यकर्त्यांचे नियोजन, प्रचार यंत्रणेची आखणी आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याचे काम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले. उमेदवारी निवडीपासून ते प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत प्रत्येक बाबीकडे त्यांनी बारकाईने लक्ष दिले.

काही ठिकाणी संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली, मतभेद झाले, मात्र अशा वेळीही त्यांनी संयम राखत शांतपणे निर्णय घेतले. सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन त्यांनी काम केल्यामुळे दोन्ही प्रभागांमध्ये भाजपला अपेक्षेपेक्षा मोठा विजय मिळाला.

विजयानंतर बोलताना यशवंत लायगुडे यांनी स्पष्टपणे सांगितले की, "मला कोणत्याही वैयक्तिक पदाची अपेक्षा नाही. मात्र समाविष्ट गावांतील या प्रभागातील सदस्यांना स्थायी समितीमध्ये स्थान मिळायला हवे. या भागाचा विकास करण्यासाठी मोठ्या निधीची गरज आहे आणि तो निधी मिळवण्यासाठी येथील प्रतिनिधी स्थायी समितीमध्ये असणे आवश्यक आहे."

तसेच त्यांनी हा विजय माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील विकासकामांवर मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाचा परिणाम असल्याचे सांगितले.

हा विजय भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**एकूणच, वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा परिसराचा विकास, कार्यकर्त्यांचा सन्मान आणि पक्षसंघटन यांना प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून यशवंत लायगुडे यांची या निवडणुकीत ठळक ओळख निर्माण झाली आहे.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.